माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ३८५० / २०२४ / सातारा

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| बाळकृष्ण सदाशिव पिसे | स्थापत्य अभियंता, म्हसवड नगरपरिषद कार्यालय, जि. सातारा | मुख्याधिकारी, म्हसवड नगरपरिषद कार्यालय, जि. सातारा |

**( सुनावणी दिनांक - १७ / ११ /२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. २०.०६.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " आवश्यक माहिती न मिळाल्यामुळे " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| २६.०२.२०२४ | तहसिलदार यांनी दि. १०.०२.२०२३ रोजी यांचेकडील नोटीस, सि.स.न. ३५५ मधील अतिक्रमण हटविणेबाबत मानवी आयोगाकडून आलेल्या पत्राची झेरॉक्स, सि.स.न. ३५५ ची न.पा. मालकी असलेली कागदपत्रे. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, " अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. २१.०३.२०२४ रोजीच्या पत्राने उत्तर देवून माहिती उपलब्ध नाही म्हणून कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन दि.२९.०४.२०२४

रोजी माहिती म्हसवड नगरपरिषद कार्यालयात उपलब्ध नाही यास्तव सदरचा अर्ज निकाली ठेवणेत येत आहे, असा आदेश पारित केला आहे. "

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. २१.०३.२०२४ रोजीच्या पत्राने अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्याचे कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध नाही, यास्तव अपील निकाली काढले आहे. प्रस्तुत प्रकरणात नियमाप्रमाणे कार्यवाही झाली आहे. अपिलार्थी आजरोजी सुनावणीकामी गैरहजर असल्याने त्यांचे म्हणणे एकूण घेता आले नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३८५० / २०२४ / सातारा 10842/2025 दिनांक-11/12/2025